महासागर

गुरुवार, १२ जून २०२५

मुंबई

# आता फक्त ठाकरे ब्रँड!

## काका- पुतण्याचा एकत्र फोटो; शिवसेना भवन, शिवतीर्थासमोरील बॅनरची राज्यभरात चर्चा

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार अशी चर्चा सुरू असतानाच आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त युवा सेनेने लावलेल्या फलकांची सर्वत्र चर्चा होतेय. मुंबईत शिवसेना भवन आणि राज ठाकरेंचे निवासस्थान असलेल्या शिवतीर्थासमोर हे बॅनर लावण्यात आले असून मनसेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच राज ठाकरे हे ठाकरे गटाशी संबंधित एखाद्या फलकावर झळकले आहेत.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस 14 जून आणि शिवसेना- ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांचा वाढदिवस 13 जूनला असतो. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे अशी मागणी वारंवार केली जात आहे. सध्याची राजकीय परिस्थिती पाहता ठाकरे बंधूंनी एकत्र यावे अशी चर्चा पुन्हा एकदा सुरू आहे. ठाकरे गट आणि मनसेचे नेतेही यावर भाष्य करत असले तरी चर्चेपलीकडे गाडी पुढे सरकलेली नाही. ठाकरे बंधू एकत्र कधी येणार हा प्रश्न कायम असला तरी मुंबईतल्या शिवसेना भवनासमोरील बॅनरची सर्वत्र चर्चा आहे.युवा सेनेचे पदाधिकारी स्वप्निल सूर्यवंशी, हर्षल पळशीकर, रणजित कदम, प्रदीप सावंत यांनी शिवसेना भवन आणि शिवतीर्थ येथे बॅनर लावले आहेत. "आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे यांना शुभेच्छा. आता फक्त आणि फक्त एकच ठाकरे ब्रँडच चालणार" असं या बॅनरवर लिहिलंय. यापूर्वी पुण्यातही एकाच बॅनरवर राज ठाकरे आणि आदित्य ठाकरेंचा एकत्र फोटो छापण्यात आला होता. शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर पहिल्यांदाच ठाकरे गटाच्या बॅनरवर राज ठाकरेंचा फोटो झळकल्याने दोन्ही मनसे आणि ठाकरे गट एकत्र येण्याच्या आशा पल्लवित झाल्या.

# मुंबई महापालिका जिंकण्यासाठी शिंदेंचा मास्टरप्लान सुरू!

- खुद्द उपमुख्यमंत्री शिंदे थेट कामांच्या आढाव्याला लागले
- प्रलंबित कामांना गती देत ठाकरेंवर कुरघोडी

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेवर वर्चस्व मिळवण्यासाठी शिंदे गटाची रणनिती आता प्रत्यक्ष अंमलात येऊ लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वतः मैदानात उतरून शिवसेना (शिंदे गट)च्या ताब्यातील विधानसभा मतदारसंघांतील प्रलंबित कामांचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. शासकीय यंत्रणांना अडचणी दूर करण्याचे स्पष्ट आदेश देत शिंदे यांनी निवडणुकीच्या तयारीला वेग दिला आहे.

**कुर्ला आणि चांदीवलीवर विशेष लक्ष**

कुर्ला विधानसभा मतदारसंघातील आमदार मंगेश कुडाळकर यांच्या भागातील प्रलंबित कामांबाबत शिंदे यांनी थेट उच्चस्तरीय बैठक बोलावली. या बैठकीत स्थानिक प्रकल्प, विकासकामे, नागरी समस्या यावर चर्चा झाली असून




तातडीने निर्णय घेण्याचे आदेश देण्यात आले.

त्याचप्रमाणे, चांदीवली मतदारसंघातील आमदार दिलीप लांडे यांच्या भागातील प्रलंबित कामांवरही उपमुख्यमंत्र्यांनी लक्ष केंद्रीत केले आहे. यामुळे या मतदारसंघातील कामांना गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई महापालिका निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून शिंदे गटाने ठोस हालचाली सुरू केल्या आहेत. ठाकरे गटाच्या तुलनेत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी विकासकामांचा झपाटा लावण्याचा प्रयत्न सुरु आहे. शिंदेंच्या सेनेकडील मतदारसंघांमध्ये कामांची गती वाढल्याने, स्थानिक जनता खुश होण्याची शक्यता आहे, आणि त्याचा थेट फायदा आगामी निवडणुकीत मिळेल, असा भाजप-शिंदे गटाचा विश्वास आहे. मुंबई महापालिका निवडणूक म्हणजे शिवसेना गटांमध्ये प्रतिष्ठेची लढाई! त्यामुळेच शिंदे गट काहीही करून सत्ता मिळवण्याच्या तयारीला लागलेला दिसतो. खुद्द एकनाथ शिंदे यांनी प्रशासनाला हाताशी धरत विकासकामांच्या माध्यमातून मतदारांमध्ये विश्वास निर्माण करण्याची मोहीम सुरू केली आहे. या रणनितीमुळे ठाकरे गटासाठी आगामी लढत अधिक कठीण होण्याची शक्यता आहे.

# राष्ट्रवादीतून मामा-भाचे बाहेर पडणार?

## जयंत पाटीलांचे राजीनाम्याचे संकेत, प्राजक्त तनपुरेंची अनुपस्थिती खळबळजनक!

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या 26 व्या वर्धापन दिनानिमित्त पुण्यात पार पडलेल्या मुख्य कार्यक्रमात अनेक घडामोडींनी पक्षाच्या अंतर्गत घुसमटीचे चित्र अधोरेखित केले. प्रमुख नेते शरद पवार यांच्यापासून ते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि माजी मंत्री प्राजक्त तनपुरे या मामा-भाच्यांच्या हालचालींनी सध्या महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आलं आहे.

**शरद पवारांची देहबोली आणि व्यथित सूर...**

शरद पवारांनी आपल्या भाषणात स्पष्ट शब्दांत पक्षात झालेल्या फुटीबद्दल खंत व्यक्त केली. "पक्षात फूट पडेल असं वाटलं नव्हतं… काही लोक दुसऱ्या विचारसरणीने गेले, ही फूट आता वाढली आहे," असं म्हणत त्यांनी आगामी निवडणुकीत वेगळं चित्र समोर येईल, असा इशाराही दिला. त्यांचा चेहरा आणि देहबोली मात्र अतिशय निराशाजनक होती, ज्यातून त्यांच्या मनातली खळबळ दिसून आली.

**जयंत पाटीलंचे राजीनाम्याचे संकेत**

कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या भाषणात थेट राजीनामा देण्याचे सूतोवाच करत उपस्थित कार्यकर्त्यांना भावुक केलं. "सात वर्षे जबाबदारी सांभाळली, आता नवीन चेहऱ्यांना संधी मिळायला हवी," असं म्हणत त्यांनी आपले पवारसाहेबांप्रती कृतज्ञता



व्यक्त केली. त्यांच्या या भाषणामुळे अनेकांच्या मनात प्रश्न उभे राहिले की, जयंत पाटील पुढे कुठे जाणार?

**भाच्याची गूढ अनुपस्थिती – प्राजक्त तनपुरेंनी कार्यक्रमाला दांडी का मारली?**

या कार्यक्रमात जयंत पाटलांचे भाचे आणि राहुरीचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे अनुपस्थित होते. विशेष म्हणजे ते पुण्याला अगदी जवळ असलेल्या राहुरीतच होते. त्यांनी केवळ १५० किमी अंतर असलेला वर्धापन दिन सोहळा टाळल्याने त्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. त्यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा पुन्हा एकदा जोर धरू लागल्या आहेत.

**भाजपमध्ये प्रवेश? – संकेत अनेक!**

प्राजक्त तनपुरेंच्या राहुरी साखर कारखान्याच्या निवडणुकीत भाजपमधील विखे गटाकडून मिळालेली कथित 'आंतरिक मदत' आणि कारखान्याच्या विजयानंतर त्यांच्या काकांनी 'आठ दिवसांत गोड बातमी' देण्याचा दिलेला इशारा – या सगळ्या गोष्टी भाजप प्रवेशाचीच तयारी असल्याचे सूचित करत आहेत.

**जयंत पाटील आणि रोहित पवारांतील मतभेद?**

सूत्रांच्या माहितीनुसार, जयंत पाटील आणि आ. रोहित पवार यांच्यातील मतभेदही गेल्या काही काळात वाढले आहेत. जयंत पाटील भाजपकडे झुकत असल्याची चर्चा होती, मात्र पवार कुटुंबीयांमध्ये सलोखा झाल्यास त्यांचा प्रवेश रखडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आता अजित पवार गटाशी जवळीक साधण्याचा किंवा थेट भाजप प्रवेशाचा मार्ग जयंत पाटील स्वीकारणार का, हे पाहणं औत्सुक्याचं ठरत आहे.

शरद पवारांची खंत, जयंत पाटील यांचे राजीनाम्याचे सूतोवाच, आणि प्राजक्त तनपुरेंची गूढ अनुपस्थिती — या सगळ्यांचा संगम पाहता राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत मोठा भूकंप लवकरच होणार, हे स्पष्ट आहे. मामा-भाचे कोणत्या दिशेने वळणार? भाजपमध्ये प्रवेश करणार की अजित पवार गटात विलीन होणार? हे प्रश्न आगामी दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणात धुरळा उडवणारे ठरणार आहेत.

# हायकोर्टातील सुनावणी लवकरच 'लाईव्ह'

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

न्यायालयाचे कामकाज पाहायचे किंवा सुनावणी ऐकायची झाली तरी कोर्टाची पायरी चढावीच लागते. त्यातही प्रकरणात पक्षकार असल्यास वारंवार न्यायालयाचे हेलपाटे मारावे लागतात. न्यायालयात माराव्या लागणाऱ्या फेऱ्यांपासून आता सुटका होणार आहे. उच्च न्यायालयातील सुनावणीचे थेट प्रक्षेपण लवकरच पाहता येणार आहे. यासाठी मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी हिरवा कंदील दाखवला आहे.

न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रक्षेपण सुरू करण्यासाठी तांत्रिक व्यवस्था केली जात आहे, असे उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांनी स्पष्ट केले आणि सुनावणी लवकरच लाईव्ह पाहता येणार असल्याचे संकेत दिले.

उच्च न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी जनहित याचिका दाखल केल्याचे अ‍ॅड. मॅथ्यूज नेदुमपारा यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. त्यावर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने थेट प्रक्षेपणासाठी तांत्रिक व्यवस्था केली जात असल्याचे नमूद केले. आम्ही याबाबत लक्षणीय प्रगती केली आहे.

पूर्णपीठाने काही न्यायालयांचे थेट प्रक्षेपण करण्याचा ठराव मंजूर केला आहे. त्या अनुषंगाने तांत्रिक व्यवस्था केल्या जात आहेत. सुरुवातीला पाच खंडपीठापुढील सुनावणींचे थेट प्रक्षेपण केला जाईल, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

# वरिष्ठ पोलीस निरीक्षकाची मालमत्ता 297 टक्क्यांनी फुगली! बेहिशेबी संपत्तीप्रकरणी गुन्हा दाखल

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

एका बांधकाम व्यावसायिकाकडून चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना गेल्या सप्टेंबर महिन्यात रंगेहाथ पकडले गेलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांच्या बेहिशेबी मालमत्तेचे धक्कादायक वास्तव आता समोर आले आहे. कदम यांनी त्यांच्या अधिकृत उत्पन्नाच्या स्रोतांपेक्षा तब्बल २९७ टक्के अधिक, म्हणजेच सुमारे ३ कोटी ४८ लाख ४० हजार रुपयांची मालमत्ता गैरमार्गाने जमा केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) सखोल चौकशीत ही धक्कादायक माहिती उघड झाली आहे. याप्रकरणी एसीबीने त्यांच्याविरुद्ध उलवे पोलीस ठाण्यात सोमवारी (दि.९) गुन्हा दाखल केला असून, पोलीस दलात यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

एनआरआय पोलीस ठाण्याचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असताना सतीश कदम हे गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात लाचेच्या जाळ्यात अडकले होते. नवी मुंबईतील उलवे येथे एका बांधकाम व्यावसायिक महेश कुंभार यांच्याकडून चार लाख रुपयांची लाच स्वीकारताना मुंबई एसीबीच्या विशेष पथकाने त्यांना रंगेहाथ अटक केली होती. ही कारवाई इतकी गोपनीय होती की कदम यांना पळ काढण्याची संधीच मिळाली नाही. त्यावेळी एसीबीच्या पथकाने कदम यांच्या उलवे येथील निवासस्थानाची झडती घेतली असता, तेथून मोठी बेहिशेबी रोकडही जप्त करण्यात आली होती. याच घटनेनंतर कदम यांच्या



एकूण संपत्तीबाबत संशय बळावला होता आणि प्राथमिक तपासात त्यांनी मोठ्या प्रमाणात गैरमार्गाने संपत्ती जमवल्याचे संकेत एसीबीला मिळाले होते. त्यामुळेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकांनी त्यांच्या संपत्तीची उघड चौकशी करण्याचे तात्काळ आदेश दिले होते.

महासंचालकांच्या आदेशानंतर, एसीबीच्या मुंबई युनिटचे पोलीस निरीक्षक कृष्णा मेखले आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांच्या पथकाने अत्यंत बारकाईने आणि गोपनीय पद्धतीने सतीश कदम यांच्या मालमत्तेची चौकशी सुरू केली. कदम यांनी पोलीस सेवेत दाखल झाल्यापासून, विशेषतः १ डिसेंबर २०१३ ते ९ ऑक्टोबर २०२४ या सुमारे ११ वर्षांच्या कालावधीत जमा केलेल्या चल-अचल संपत्ती, बँक खाती, गुंतवणूक आणि इतर आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास करण्यात आला. तब्बल सहा महिने चाललेल्या या किचकट चौकशीअंती, कदम यांनी त्यांच्या कायदेशीर उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा तब्बल ३ कोटी ४८ लाख ४० हजार रुपयांची अतिरिक्त मालमत्ता गोळा केल्याचे स्पष्ट झाले. ही रक्कम त्यांच्या एकूण कायदेशीर उत्पन्नाच्या २९७ टक्के इतकी प्रचंड आहे.

एसीबीच्या तपासात असेही निष्पन्न झाले आहे की, तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम यांनी आपल्या सेवाकाळात, विशेषतः पोलीस दलातील आपल्या पदाचा आणि अधिकाराचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला. त्यांनी स्वतःच्या तसेच आपल्या कुटुंबीयांच्या नावे ही कोट्यवधी रुपयांची बेहिशेबी मालमत्ता गैरमार्गाने आणि भ्रष्ट मार्गांनी कमावली. या गंभीर आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कृत्याबद्दल, एसीबीच्या मुंबई युनिटने सोमवारी नवी मुंबईतील उलवे पोलीस ठाण्यात सतीश कदम यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १३(१)(ब) (गुन्हेगारी गैरवर्तन करून बेहिशेबी मालमत्ता जमवणे) आणि कलम १३(२) (गुन्हेगारी गैरवर्तनासाठी शिक्षा) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यानेच अशा प्रकारे भ्रष्टाचाराच्या माध्यमातून अमाप संपत्ती गोळा केल्याचे उघड झाल्याने पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का लागला आहे. सामान्य नागरिकांच्या रक्षणाची जबाबदारी असलेल्या व्यक्तींकडूनच असे कृत्य घडल्यास जनतेचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होऊ शकतो. एसीबीने या प्रकरणात केलेली कारवाई ही अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांसाठी एक कडक इशारा असून, या प्रकरणाच्या पुढील तपासात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, या प्रकरणामुळे शासकीय सेवेतील भ्रष्टाचाराच्या समस्येची गंभीरता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

# सामाजिक न्याय विभागाचा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनामार्फत अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील नागरिकांचे जीवन सुसह्य करण्यासाठी विविध राबविल्या जातात. या प्रवर्गातील नागरिकांना गृहनिर्माणच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे घर दिले जाते. केंद्र शासनाने या वर्षी 30 लाख घरे राज्याला उपलब्ध करून दिली आहेत. त्यामुळे कोणीही व्यक्ती बेघर राहणार नाही. ग्रामीण भागात अनुसूचित जाती व जमाती मधील नोंदीत असलेल्या प्रत्येक कुटुंबाला यावर्षी प्राधान्याने घर देण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२३-२४ आयोजित पुरस्कार वितरण सोहळा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे झाला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, मृद व जलसंधारण संजय राठोड, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आमदार संतोष बांगर आदी



मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तयार केलेले भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधान आहे. त्यात मानवता, समता, बंधुता आणि संधीची समानता आहे. भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून 'घरोघरी संविधान' हा उपक्रम राज्यात राबवण्यात येत असून त्यातून उद्देशिका प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवली जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महापुरुषांचे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचे कार्य शासन सातत्याने करत आहे. जे समाजाच्या भल्यासाठी निस्वार्थ भावनेने कार्य करतात, अशा व्यक्तींच्या पाठीशी शासन कायम उभे आहे. राज्यात अनुसूचित जाती व जमातींसाठी विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, त्यामध्ये शिष्यवृत्ती योजना, आश्रमशाळा, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, परदेशी शिक्षणासाठी साहाय्य, तसेच महामंडळांच्या माध्यमातून रोजगाराभिमुख योजना राबविल्या जात आहेत. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम किसान योजना, पीएम फसल बीमा योजना, मुद्रा योजना आणि स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती-जमातीतील घटकांना लाभ मिळाला आहे. केंद्र शासनाच्या धोरणांमुळे लाखो तरुण उद्योजक घडत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक अंतिम टप्प्यात असून लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, क्रांतिगुरु लहूजी वस्ताद साळवे यांची स्मारके उभारण्याची कामेही वेगाने सुरु असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. सामाजिक न्याय विभागाचा निधी त्याच विभागाच्या उद्दिष्टपूर्तीसाठीच वापरण्यात येत आहे, असे स्पष्ट करत त्यांनी समाजहितासाठी कार्य करणाऱ्या पुरस्कार प्राप्त व्यक्ती आणि संस्था यांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले.

# पालिकेतील सर्व कामगार संघटना एकवटल्या

- सफाई खाते व परिवहन खात्याचे खाजगीकरण रोखण्यासाठी पुढाकार
- म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समितीची केली स्थापना

**मुंबई, दि. ११ : प्रतिनिधी**

मुंबई महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन खाते व परिवहन खात्यातील कायम कामगारांचे काम ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी काढण्यात आलेले १४ मे २०२५ चे टेंडर रद्द करण्यासाठी महापालिकेतील कामगार संघटना एकवटल्या आहेत. त्यांनी कामगार संघटना संघर्ष समितीची स्थापना केली आहे.

या संघर्ष समितीच्यावतीने बुधवार ११ जून २०२५ रोजी दुपारी २ वाजता शिवाजी मंदीर, दादर पश्चिम, येथे म.न.पा.प्रशासनाने एकतर्फीपणे सुरू केलेले खाजगीकरण रोखण्यासाठी कामगारांच्यावतीने आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी दुपारी २.०० वा. प्रचंड मेळाव्याचे आयोजन केलेले होते. सदर मेळाव्यात म.न.पा. प्रशासनाने १४ मे २०२५ रोजी काढलेले टेंडर रद्द न केल्यास कामगार- कर्मचारी आंदोलनाची भूमिका घेतील अशी माहिती संघर्ष समितीचे निमंत्रक वामन कविस्कर यांनी दिली आहे. या मेळाव्यास उपरोक्त सर्व नेते उपस्थित राहून कामगार- कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत, असेही त्यांनी सांगितले.

**विरोध करण्यासाठी लेखी पत्रव्यवहार**

मुंबई महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन



खात्यांतर्गत साफसफाई आणि परिवहन खात्यातील कामे 'एरिया बेस'च्या नावाखाली ठेकेदारामार्फत करून घेण्यासाठी म.न.पा. प्रशासनाने १४ मे २०२५ रोजी टेंडर काढलेले आहे. याबाबत विविध संघटनांनी आपआपल्या संघटनेच्यावतीने सदर टेंडरला विरोध करण्यासाठी लेखी पत्रव्यवहार केलेला आहे. याबाबत म.न.पा. प्रशासनाकडून कोणत्याही संघटनेला कामगार- कर्मचाऱ्यांवतीने आपली बाजू मांडण्यासाठी संधी दिलेली नाही. म्हणून पालिकेतील म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबई, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना, मुंबई म्युनिसिपल कामगार संघ, दि म्युनिसिपल युनियन, कचरा वाहतुक श्रमिक संघ, म्युनिसिपल मजदूर संघ आणि महापालिकेतील कामगार संघटना यांनी एकत्र येऊन 'म.न.पा. कामगार संघटना संघर्ष समिती'ची स्थापना काल गुरुवार ५ जून २०२५ रोजी म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबईच्या कार्यालयात घेण्यात आलेल्या बैठकीत करण्यात आली आहे.

**विविध पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

सदर बैठकीला म्युनिसिपल मजदूर युनियनच्यावतीने संघटनेचे अध्यक्ष अशोक जाधव, सरचिटणीस वामन कविस्कर, सहा. सरचिटणीस शैलेंद्र खानविलकर, अँड. जगन्नाथ लिंगम, प्रदिप नारकर, प्रफुल्लता दळवी उपस्थित होते. म्युनिसिपल कामगार सेनेच्यावतीने अध्यक्ष बाबा कदम, सरचिटणीस सत्यवान जावकर, उपाध्यक्ष संजय बापेरकर, संजय वाघ, मुंबई म्युनिसिपल कामगार संघाच्यावतीने कार्याध्यक्ष शेषराव राठोड, सरचिटणीस संजीवन पवार,.दि म्युनिसिपल युनियनच्यावतीने सरचिटणीस रमाकांत बने, कार्याध्यक्ष सुनिल शिंदे, उपाध्यक्ष रंगनाथ सातवसे व नरेश चौहाण उपस्थित होते. तर म्युनिसिपल मजदुर संघाच्यावतीने सरचिटणीस प्रकाश जाधव उपस्थित होते आणि कचरा वाहतुक श्रमिक संघाच्यावतीने अध्यक्ष अँड. दिपक भालेराव व सरचिटणीस मिलिंद रानडे उपस्थित होते.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**

**- जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (२४ जून २०२१ पर्यंत सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ ७** मधील 'आर/उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव असे **एकूण ०१** प्रस्तावांना कलम ८ (६) अन्वये मा. म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनर्रापित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या www.mcgm.gov.in संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिके विषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. WS283-R/North.

**सही/-**
**उद्यान अधिक्षक**
**व वृक्ष अधिकारी**
**उद्यान अधिक्षक यांचे कार्यालय,**
**पेंग्विन इमारत, २ रा माळा**
**वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,**
**भायखळा (पूर्व) मुंबई - 40002**
**दुरध्वनी क्र. २३७४२१६२ E.mail – sg.gardens@mcgm.gov.in**

**पीआरओ/६४५/जाहि./२०२५-२६**

थोडासाही ताप येता, डॉक्टरांना जाऊन भेटा

महासागर



# कर्नाक उड्डाणपुलाचे बांधकाम नियोजित कालावधीत पूर्ण



**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि'मेलो मार्गाला जोडणा-या कर्नाक रेल्वे उड्डाणपुलाचे मुख्य बांधकाम नियोजित कालावधीत म्हणजेच दिनांक १० जून २०२५ रोजी पूर्ण झाले आहे. आता वाहतुकीच्या अनुषंगाने मार्ग रेषा आखणी, पथदिवे, रंगरंगोटी, दिशादर्शक फलक उभारणी कामे प्रगतिपथावर असून ती येत्या चार दिवसात पूर्ण होत आहेत. सद्यस्थितीत कर्नाक रेल्वे पूल वाहतुकीसाठी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याकामी सज्ज आहे.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी आज (दिनांक १० जून २०२५) कर्नाक पुलाची उभारणी, स्थापत्य कामे व अनुषंगिक कामांची पाहणी केली. प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते, उपप्रमुख अभियंता राजेश मुळे यांच्यासह संबंधित अभियंते यावेळी उपस्थित होते.

दक्षिण मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मशीद बंदर आणि मोहम्मद अली मार्ग परिसरातील वाहतुकीसाठी कर्नाक पूल महत्त्वाचा आहे. १२५ वर्ष जुना कर्नाक पूल धोकादायक झाल्याचे मध्य रेल्वे प्रशासनाने घोषित केले. त्यानंतर मध्य रेल्वे प्रशासनाने ऑगस्ट २०२२ मध्ये पुलाचे निष्कासन केले. मशीद बंदर परिसरात पूर्व आणि पश्चिम परिसर जोडणारा विद्यमान मार्ग कायम ठेवण्यासाठी मुंबई महापालिकेने या पुलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेतले. मध्य रेल्वे प्राधिकरणाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार कर्नाक पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. सद्यस्थितीत आर.सी.सी. डेक स्लॅब, डांबरीकरण, महानगरपालिकेच्या हद्दीतील पूर्व आणि पश्चिम बाजूचे पोहोच रस्ते इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

**दोन तुळया स्थापित**

या पुलाची एकूण लांबी ३२८ मीटर असून रेल्वेच्या हद्दीत ७० मीटर इतकी आहे. महानगरपालिका हद्दीतील पोहोच रस्त्याची एकूण लांबी २३० मीटर असून पूर्वेस १३० मीटर व पश्चिमेस १०० मीटर इतकी आहे. लोहमार्गावरील पुलाच्या उभारणीकामी आरसीसी आधारस्तंभ यावर प्रत्येकी ५५० मेट्रिक टन वजनी ७० मीटर लांब, २६.५० मीटर रूंद आणि १०.८ मीटर उंचीच्या दोन तुळया स्थापित करण्यात आल्या आहेत.

या प्रकल्प अंतर्गत ५५० मेट्रिक टन वजनाची दक्षिण बाजूची लोखंडी तुळई दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी आणि उत्तर बाजूची लोखंडी तुळई दिनांक २६ आणि ३० जानेवारी २०२५ रोजी रेल्वे भागात सरकविण्याची कार्यवाही यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने वाहतूक व वीज पुरवठा या दोन्ही घटकांमध्ये घेतलेल्या विशेष खंड (स्पेशल ब्लॉक) दरम्यान तुळई सुरक्षितरित्या व यशस्वीपणे सरकवण्यात आली आहे. ५५० मेट्रिक टन वजनाच्या लोखंडी तुळईची जुळवणी जमिनीपासून ८ ते ९ मीटर उंचीवर पूर्ण करून, रेल्वे भागावर ५८ मीटर अधांतरी सरकविणे, सुमारे २ मीटर उंचीवरुन खाली उतरविणे, आर.सी.सी. आधारस्तंभावर स्थानापन्न करणे अशाप्रकारचे स्थापत्य अभियांत्रिकीदृष्ट्या हे काम अत्यंत आव्हानात्मक, जोखमीचे काम होते. त्यासाठी विशेष तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**लवकरच पूल वाहतुकीस खुला करण्याचा निर्णय**

या पार्श्वभूमीवर अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर म्हणाले की, वाहतूक पोलिस विभागाच्या विशेष परवानगीने, महापालिकेच्या पूल विभागामार्फत मागील दोन महिने दररोज २४ तास पुलाचे काम सुरू होते. त्यामुळे विक्रमी वेळेत पुलाचे मुख्य बांधकाम पूर्ण करणे झाले आहे. भार चाचणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्हीजेटीआय) च्या तज्ज्ञांशी सल्लामसलत करून आणि वाहतूक पोलिसांसमवेत समन्वय साधून पूल वाहतुकीस खुला करण्याचा निर्णय घेतला जाईल, असे बांगर यांनी नमूद केले.

**कर्नाक पुलाच्या पुनर्बांधणीचे फायदे**

- मुंबई शहराच्या दक्षिणेतील पूर्व-पश्चिमेला जोडणारा महत्त्वाचा दुवा
- पूर्व-पश्चिम वाहतुकीसाठी सुरक्षित व वाढीव सुविधा उपलब्ध होणार
- पूर्व मुक्तमार्गावरून येणारी वाहतूक, तसेच पी. डि'मेलो मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत
- पी. डि'मेलो मार्गावरून गिरगाव, चर्चगेट, मंत्रालय, काळबादेवी, धोबी तलाव परिसरात वाहतूक सुविधा
- युसूफ मेहरअली मार्ग, मोहम्मद अली मार्ग, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, काझी सय्यद मार्ग या भागातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार

# शाहीरी लोककला मंच लोककलाकारांचा भव्य मेळावा संपन्न




**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

कै. शाहिरी लोककला मंच नेराळे परिवार आयोजित शाहिरी लोककलेचे अभ्यासक लोककलाकारांचे आधारस्तंभ कै. मधुकर शेठ नेराळे यांच्या जन्मदिना निमित्त मुंबई शाहीर लोक कलाकारांचा भव्य मेळावा सोमवार दिनांक ९ जून रोजी न्यू हनुमान थिएटर, चिवडा गल्ली, लालबाग येथे आयोजित करण्यात आला.

या मेळाव्यात शाहिरी लोकगीते, लोकनृत्य, यांचा सुंदर नजराणा रसिक प्रेक्षकांसाठी सादर करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाहीर-शांताराम चव्हाण, मधु खामकर ,दत्ता ठुले, पदाधिकारी -खैरमोडे काशिनाथ माटल, मनोहर गोलांवरे, गणेश कारंडे, अशोक वायंगणकर तसेच स्वरिता पाटकर, शर्वरी पवार, रसिका परब, विमल वाळुंज, बाबुराव बुद्रुक, विजय पवार,रोहित शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# लावणी कलावंत महासंघाचे पुरस्कार जाहीर

## शाहीर मधुकर खामकर,निर्माते उदय साटम यांचा समावेश



**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

लावणी कलावंत महासंघ, मुंबई यांचा ११ वा वर्धापनदिन आणि पुरस्कार सोहळा २०२५ मंगळवार, दिनांक २४ जून, २०२५ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज मंदिर, दादर येथे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

सदर सोहळ्यात सालाबादाप्रमाणे याही वर्षी लावणी आणि लोककला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनेक मान्यवर कलावंतांना लावणी गौरव आणि जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. याप्रसंगी शाहीरी परंपरेतील जेष्ठ शाहीर मधुकर खामकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहेत, तर लावण्यवती प्रज्ञा कोळी, शाहीर दत्ताराम म्हात्रे, गायिका वंदना निकाळे, पुरुष लावणी कलाकार आनंद साटम, निर्माते उदय साटम, वादक धीरज गोरेगांवकर, नृत्यदिग्दर्शक सुभाष नकाशे, निवेदक भरत उतेकर, लोककलेसाठी सुनिल ढगे, नेपथ्य तंत्रज्ञ म्हणून सुनील देवळेकर या कलाकारांना लावणी गौरव २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. किरण डांगे आणि सुजाता कांबळे-डांगे या कलाकार दांपत्याचा राजाराणी - २०२५ या पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. तसेच सदर सोहळ्यात कलाकारांच्या इयत्ता दहावी बारावीच्या परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पाल्यांचा देखील सन्मान केला जाणार आहे. सोबत महासंघाच्यावतीने आयोजित नवरात्र सोहळ्यातील नवरंग स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सन्मानित करण्यात येणार आहे.

सदर सोहळ्यात मुंबईतील नामवंत कलाकारांच्यावतीने दिमाखदार नृत्यविष्कारासह सांगितिक कार्यक्रम सुद्धा सादर होणार आहे, असे अध्यक्षा कविता घडशी यांनी सांगितले.

# कॅपिटल मार्केटमधून निधी उभारणारी पिंपरी-चिंचवड ही देशातील पहिली महापालिका- मुख्यमंत्री

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

देश विकसित होण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महापालिकांनी आर्थिक बाबतीत आत्मनिर्भर व्हायला पाहिजे, असा आग्रह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सातत्याने राहिला आहे. पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्जरोखे जारी केले. अशा 'कॅपिटल मार्केट' मधून निधी उभारणारी पिंपरी- चिंचवड ही देशातील पहिली महापालिका ठरली आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

पिंपरी-चिंचवड महापालिकेचा हरित कर्जरोखे मुंबई शेअर बाजारात लिस्टिंग कार्यक्रम बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मधील बीएसई आंतरराष्ट्रीय सभागृहात पार पडला. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, आमदार उमाताई खापरे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंग, अप्पर मुख्य सचिव असिम गुप्ता, प्रधान सचिव डॉ. के गोविंदराज,बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक सुंदरम रामामूर्ती व्यासपीठावर उपस्थित होते.

# घनकचरा व्यवस्थापन विभागातील कायमस्वरूपी गैरहजर असलेल्या कर्मचाऱ्यांवर होणार कठोर कारवाई

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**



स्वच्छता ही केवळ एखाद्या विशिष्ट अभियानापुरती मर्यादित न ठेवता नियमित आणि जबाबदारीने स्वच्छता राखण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन विभागातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी सक्रियपणे कार्य करावे. तथापि, घनकचरा व्यवस्थापन विभागातील प्रत्यक्ष दैनंदिन स्वच्छता करण्यासाठी नेमलेले मात्र कायमस्वरूपी गैरहजर असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, असे निर्देश अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात शहर विभागातील सर्व प्रशासकीय विभागांच्या कामगिरीचा डॉ.जोशी यांनी एफ (दक्षिण) विभाग कार्यालयात आयोजित बैठकीत आज मंगळवारी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले.

उपायुक्त (परिमंडळ-१) डॉ.संगीता हसनाळे, उपायुक्त (परिमंडळ-२) प्रशांत सपकाळे, उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर, शहर विभागातील सर्व प्रशासकीय विभागांचे (वॉर्ड) सहायक आयुक्त तसेच घनकचरा व्यवस्थापन विभागाचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

आढावा घेतल्यानंतर अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी म्हणाल्या, 'स्वच्छतेसंदर्भात आयोजित एखाद्या अभियानात मोठ्या प्रमाणात कचरा संकलित होत असेल तर नियमितपणे देखील तितक्याच कचऱ्याचे संकलन व्हायला हवे. स्वच्छतेसंदर्भातील अभियानाने प्रोत्साहन मिळत असले तरी नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होणेही तितकेच महत्वाचे आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागात कार्यरत असलेले स्वच्छता कर्मचारी नियमितपणे त्यांची जबाबदारी पार पाडत असल्याची खात्री संबंधित अधिकाऱ्यांनी करावी. तथापि, ४५ दिवसांपेक्षा अधिक कालावधीपासून एखादा कर्मचारी कायमस्वरुपी गैरहजर असल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करावी. सहायक मुख्य पर्यवेक्षक, कनिष्ठ अभियंता आदींनी 'सचेत' ॲपचा नियमितपणे वापर करावा. तसेच, संबंधित प्रशासकीय विभागाच्या सहायक आयुक्त यांनी आपापल्या भागातील घनकचराविषयक गरजा, मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होणारी ठिकाणे आणि नागरिकांच्या वर्दळीच्या वेळा लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार नियोजनासाठी सूक्ष्म आराखडा सादर करावा', असे निर्देशही डॉ.अश्विनी जोशी यांनी यावेळी दिले. प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर कार्यरत असलेले सहायक मुख्य पर्यवेक्षक, कनिष्ठ अभियंता यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील परिसरात नियमितपणे परिक्षण करावे. तसेच, कुठेही कचरा आढळणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी सूचना उपायुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी केली.

कुठेही कचरा आढळणार नाही, याची काळजी घ्यावी!

## माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील शिंदे गटात

# अमरावतीत शिवसेनेची ताकद वाढली

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला अमरावती जिल्ह्यात मोठा राजकीय धक्का बसला आहे. बडनेराचे माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. धाने पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनीही ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देत शिंदे गटात प्रवेश केल्याने उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची अमरावतीतील ताकद कमकुवत झाल्याची चर्चा आहे.

अमरावतीच्या बडनेरा मतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेले ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात शिंदे गटात प्रवेश केला. त्यांच्यासोबत उपमहानगरप्रमुख आणि नगरसेवक सुनील राऊत, युवा सेना जिल्हाप्रमुख श्याम धाने पाटील, उपजिल्हाप्रमुख पवन दळवी, तालुका प्रमुख राहुल लांजेवर, निलेश तिवारी, संतोष मनोहर, निलेश पारवे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनीही शिंदे गटात प्रवेश केला. या सामूहिक पक्षांतरामुळे ठाकरे गटाची अमरावतीतील पकड ढिली पडण्याची शक्यता आहे.

महायुती सरकार सत्तेत आल्यापासून ठाकरे गटातील नेते आणि कार्यकर्त्यांची गळती थांबण्याचे नाव घेत नाही. यापूर्वी सांगलीत चंद्रहार पाटील यांनी ठाकरे गटाला रामराम ठोकत शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर आता अमरावतीत ज्ञानेश्वर धाने पाटील यांच्या प्रवेशाने शिंदे यांनी ठाकरे गटाचे पश्चिम महाराष्ट्रातील वर्चस्व आणखी कमकुवत केले आहे. यापूर्वीच संजय बंड आणि प्रिया बंड यांनी शिंदे गटात प्रवेश केल्याने अमरावतीत ठाकरे गटाची ताकद आधीच कमी झाली होती.

# ऊसतोड कामगारांसाठी मोठी योजना: नोंदणी करा, ओळखपत्र मिळवा

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळामार्फत राज्यातील सर्व ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण आणि नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रक्रियेनंतर प्रत्येक कामगाराला ओळखपत्र देण्यात येणार आहे. यवतमाळचे पालकमंत्री आणि मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी सर्व ऊसतोड कामगारांना या नोंदणी प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळू शकेल.

मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, "महाराष्ट्रात ऊसतोड कामगारांची संख्या लाखोंच्या घरात आहे. हे कामगार प्रामुख्याने ग्रामीण भागात राहतात आणि वर्षातील सहा महिने स्थलांतर करून ऊसतोडणीच्या ठिकाणी वास्तव्य करतात. यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेता येत नाही. आता या सर्वेक्षण आणि नोंदणी प्रक्रियेमुळे त्यांची अधिकृत नोंद होईल आणि ओळखपत्राद्वारे त्यांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ मिळेल." त्यांनी पुढे नमूद केले की, ही प्रक्रिया पूर्णपणे मोफत असून, कामगारांनी कोणतेही शुल्क देण्याची आवश्यकता नाही.

# मेट्रो मार्ग ३च्या 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण




**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसी) ने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) आणि स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) यांच्या सहकार्याने आज मुंबई मेट्रो मार्ग ३ वर रुपे एनसीएमसी कार्ड तयार केले असून या कार्डचे अनावरण आज मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या हस्ते पार पडले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार. महसूल मंत्री, चंद्रशेखर बावनकुळे; मुख्य सचिव, सुजाता सौनिक; मेट्रो एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक, अश्विनी भिडे आणि संचालक (प्रणाली), राजीव उपस्थित होते. या नवीन सुविधेमुळे आता प्रवासी आरे जे.व्ही. एल.आर. ते आचार्य अत्रे चौक दरम्यान एनसीएमसी कार्ड वापरून सहज व संपर्करहित प्रवास करू शकतील. यामुळे तिकीट खिडकीवर रांगा टाळता येतील आणि प्रवास अधिक जलद व सुरक्षित होईल.

हे एनसीएमसी कार्ड मेट्रो मार्ग ३ सोबतच मार्ग २ अ , ७ आणि मार्ग १ वर देखील वापरता येईल, त्यामुळे एकसंध व सोयीस्कर प्रवासाचा अनुभव मिळेल. इतर मेट्रो मार्ग व 'चलो बस' सारख्या ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सने उपलब्ध करून दिलेले एनसीएमसी कार्ड्स देखील मेट्रो मार्ग- ३ वर वापरता येतील. प्रवाशांना ११ जून २०२५ पासून सकाळी ११ वाजल्यापासून ही सेवा उपलब्ध होईल. नवीन एनसीएमसी कार्ड आरे जेव्हीएलआर ते आचार्य अत्रे चौक दरम्यान कोणत्याही स्थानकावर उपलब्ध आहे आणि एसबीआयच्या सहभागी शाखांमधुन कार्ड मिळेल. हे कार्ड मोफत दिले जात आहे, मात्र वापरासाठी १०० ते २००० रुपयांपर्यंत अनिवार्य टॉप-अप करणे आवश्यक आहे.

"एनसीएमसी कार्ड हे इतर वाहतूक सुविधा जसे की बेस्ट बसेस तसेच विविध मेट्रो मार्गाच्या एकत्रीकरणच्या दृष्टीने आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक बळकट करण्याचा दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. एनपीसीआय आणि एसबीआय यांच्या सहकार्याने आम्ही मुंबईकरांसाठी एक सुलभ आणि एकत्रित प्रवासाचा अनुभव देण्यासाठी कटिबद्ध आहोत," असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांनी सांगितले.

# दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर सदनिकेचा ताबा

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**



म्हाडा मुख्यालयात काल सोमवारी झालेल्या लोकशाही दिनामध्ये दोन वर्षांपूर्वी बृहत सूचीतील संगणकीय सोडतीत पात्र ठरलेल्या नरेंद्र निगुडकर यांना ताबडतोब सदनिकेचा ताबा देण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी दिले होते. सदर निर्देशाची तात्काळ अंमलबजावणी करत अर्जदार नरेंद्र निगुडकर यांना आज मंगळवारी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांच्या हस्ते सदनिकेच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. यावेळी म्हाडाचे मुख्य अभियंता-३ शिवकुमार आडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनिल वानखडे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी उमेश वाघ आदी उपस्थित होते.

काल सोमवारी पार पडलेल्या लोकशाही दिनाच्या कार्यक्रमात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी दोन वर्षांपूर्वी बृहत सूचीतील संगणकीय सोडतीत पात्र ठरलेल्या अर्जदाराला ताबडतोब सदनिका देण्याचे आदेश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नरेंद्र निगुडकर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील बृहतसूचीवरील जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील रहिवासी असून ते संक्रमण गाळयात वास्तव्यास होते. निगुडकर यांना सन २०२४ मध्ये बृहतसूचीवरून पात्र भाडेकरू/ रहिवाशांसाठी काढण्यात आलेल्या संगणकीय सोडतीत सदनिका लागली होती. त्यानुसार त्यांनी रीतसर संक्रमण शिबिरातील गाळा मंडळाकडे सुपूर्द देखील केला होता. मात्र, अँटॉप हिल वडाळा पूर्व येथील सदनिकेचा ताबा विकासकाकडून मिळू शकला नाही याकरिता निगुडकर यांनी लोकशाही दिनात अर्ज केला होता. सदर प्रकरणाची लोकशाही दिनात गंभीर दखल घेत 'म्हाडा'चे उपाध्यक्ष जयस्वाल यांनी सदर प्रकरणी चर्चा करण्यासाठी संबंधित विकासकास तात्काळ म्हाडा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले. तसेच निगुडकर यांना वितरित करण्यात आलेल्या बृहतसूचिवरील सदनिकेचा ताबा दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी बारा वाजेपर्यंत देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. यानुसार निगुडकर यांना सदनिकेच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या.

## महत्त्वाच्या बातम्या

# राज्यातील आठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

राज्य सरकारने मंगळवारी आठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. बदल्यांमध्ये नवी मुंबईचे कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाचे आयुक्त नितीन पाटील यांची मुंबईतील महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली केली आहे; तर कापूस महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी असलेले अप्पासाहेब धुळाज यांच्यावर मंत्रालयातील ओबीसी बहुजन वेल्फेअर कल्याण विभागाच्या सचिव पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. मुंबईतील महात्मा फुले मागास वर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक असलेले लहू माळी यांची नवी मुंबईतील कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाच्या आयुक्तपदी, तर छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त बाबासाहेब बेलदार यांची माळी यांच्या जागी बदली केली आहे. गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगनाथम एम. यांच्याकडे बीड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची जबाबदारी दिली आहे. बीडचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे यांची छत्रपती संभाजीनगर येथील महावितरणे सहव्यवस्थापकीय संचालक म्हणून बदली केली आहे. त्याचबरोबर अमरावती येथील भातकुली-तिवसा उपविभागाचे सहायक जिल्हाधिकारी मिन्नू पी. एम. यांना गोंदिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आणि गडचिरोलीच्या देसाईगंज उपविभागाचे सहाय्यक जिल्हाधिकारी मानसी यांना लातूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून पाठविण्यात आले आहे.

# कुर्ला तलावाच्या सुशोभीकरणाचे काम सुरूच

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

एल वार्ड विभागातील शितल सिनेमा जवळ असलेल्या तलावाच्या सुशोभिकरणातील कामे निकृष्ट दर्जाची सुरु आहे. तसेच येथील पाणी शुध्द करण्याचा प्लांट खचला आहे. तर या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या सिमेंट पोलमुळे येथील नागरिकांच्या जीवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत प्रश्न निर्माण झाले आहे. कुर्ला भागातील बैल बाजार परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज तलावाचे सध्या सुशोभीकरनाचे काम सुरु आहे. मात्र, या कामाला येथील नागरिकांचा विरोध आहे. मुळात नव्याने उभारण्यात येणाऱ्या या सुशोभिकरणाची कामे निकृष्ट दर्जाची सुरु असल्याचा आरोप येथील रहिवाशी करत आहेत. या विभागात एकूण लोकसंख्येची लोकवस्ती आहे. दरम्यान या ठिकाणी लोक विरोध असूनही सिमेंट पोल उभारण्याचे काम सुरू आहे. यामुळे येथील रस्ता अरुंद होणार आहे.

## ड्रग्ज तस्करीप्रकरणी पदवीधरासह तिघांना अटक

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

एमडी ड्रग्ज तस्करीप्रकरणी एका पदवीधरासह तिघांना एमआयडीसी पोलिसांनी अटक केली. फरहान गुलजार खान, प्रतिक सुदर्शन जाधव आणि विजय राजाराम खटके अशी या तिघांची नावे आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी ३६ लाखांचा एमडी ड्रग्ज, दोन कार आणि सहा मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला आहे. अटकेनंतर तिन्ही आरोपींना अंधेरीतील स्थानिक न्यायालयाने सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ७ जूनला अंधेरी येथून गुलजार, तर ९ जूनला पोईसर येथून प्रतिक जाधव या दोन वाहन चालकांना एमआयडीसी पोलिसांच्या विशेष पथकाने अटक केली होती. या दोघांकडून पोलिसांनी स्कोडा आणि स्विफ्ट कारसहीत एमडी ड्रग्जचा साठा जप्त केला आहे. त्यांच्या चौकशीत त्यांना ते एमडी ड्रग्ज विजय खटके याने दिल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर या पथकाने बोईसर येथून विजय खटके याला अटक केली. विजय हा एका खासगी कंपनीत कामाला आहे. त्याने रसायनशास्त्रात एम एस्सीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे.

# ओबीसी विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवा अन्यथा विधान भवनावर धडक

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

ओबीसी विद्यार्थ्यांचे प्रश्न पावसाळी अधिवेशनापूर्वी सोडवा, अन्यथा अधिवेशन काळात विधानभवनावर धडक देऊ, असा इशारा ओबीसी जनमोर्चाचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी मंगळवारी मुंबईत दिला. ओबीसी, भटक्या विमुक्त व एसबीसी विद्यार्थी यांच्यावरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ओबीसी जनमोर्चा व ओबीसी भटक्या विमुक्त विद्यार्थी संघटना यांच्यातर्फे झालेल्या परिषदेत ते बोलत होते. या एल्गार परिषदेस चंद्रकांत बावकर, उचल्याकार लक्ष्मण गायकवाड, ॲड. अरुण जाधव, दशरथ पाटील, दिगंबर लोहार, ज्ञानेश्वर गोरे, जे. डी. तांडेल, ॲड. मंगेश ससाणे, ॲड. पल्लवी रेणके, मृणाल ढोले-पाटील, पांडूरंग मेरवळ यांची उपस्थिती होती. फेलोशिपचा निधी सरकार ओबीसी विद्यार्थी यांना निधी देत नाही. त्यासाठी सरकार विरोधात लढावे, अशा भावना विद्यार्थांनी व्यक्त केल्या. नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे ही परिषद झाली.

# तोतया म्हाडा अधिकारी महिलेला अटक

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

फ्लॅटसाठी घेतलेल्या सव्वा कोटी रुपयांचा अपहार करुन फसवणूक केल्याप्रकरणी बेला मेलवीन डिसुजा या महिलेस दिडोंशी पोलिसांनी अटक केली. या गुन्ह्यात केदार साटम, जितेंद्र राठोड आणि गिरीश राव हे तिघेही सहआरोपी असून या टोळीची मुख्य बेला असल्याचे पोलिसांनी सांगितले. यातील तक्रारदार व्यावसायिक असून ते मालाड परिसरात राहतात. त्यांच्या परिचित व्यावसायिकाने त्यांची केदारशी ओळख करुन दिली होती. त्याने त्यांना बेलाविषयी माहिती देताना ती म्हाडामध्ये वरिष्ठ अधिकारी असल्याचे सांगितले होते. त्याच्यावर विश्वास ठेवून तक्रारदाराने दादर येथील फ्लॅटसाठी ७२ लाख, त्यांच्या व्यावसायिक मित्रांनी माहीम आणि वांद्रे येथील सहा फ्लॅटच्या बुकींग आणि स्टॅम्प ड्युटीसाठी २५ लाख तर त्यांचा कर्मचाऱ्याने गोरेगाव येथील एसआरए फ्लॅटसाठी २५ लाख असे सुमारे सव्वालाख रुपये बेलाच्या सांगण्यावरुन जितेंद्र राठोड, गिरीश राव आणि केदार साटम यांना दिले होते. मात्र तीन वर्षांत त्यांना फ्लॅटचा ताबा दिला नाही. दरम्यान, ते चौघेही पळून गेल्याचे त्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी दिडोंशी पोलिसांत तक्रार केली होती.

# चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपीला पुण्यातून अटक; मुद्देमाल हस्तगत

**मुंबई, दि. ११ प्रतिनिधी**

चोरीच्या गुन्ह्यांतील एका आरोपीला देवनार पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. अरफात मोहम्मद खलुद कुरेशी असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून पोलिसांनी ९ लाख १० हजार रुपयांची कॅश आणि १८ हजाराचा मोबाईल जप्त केला. यातील तक्रारदार गोवंडीत राहत असून ईददरम्यान बकरा विक्रीतून त्यांना ११ लाख ७० हजार रुपये मिळाले होते. ही रक्कम त्यांनी त्यांच्या ड्राव्हरमध्ये ठेवली होती. ७ जूनला ही कॅश अज्ञात चोरट्याने पळवून नेल्याचे उघडकीस येताच त्यांनी देवनार पोलिसांत तक्रार केली होती.

